बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - ५७ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540

दैनिक बुधवार ३१ डिसेंबर २०२५

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

TRENDING NEWS

आश्रमच्या बबिताला 2025 मध्ये मिळाला कटु अनुभव:त्रिधा चौधरी म्हणाली- आता 2026 मध्ये आलिया भट्टच्या ट्रेनरकडून मार्शल

पान 3 वर



## थोडक्यात

### तरुणाचे डोके फोडले

**यवतमाळ :** गाडी बाहेर काढण्याच्या क्षुल्लक कारणावरून तीन जणांनी मिळून एका तरुणाला बेदम मारहाण केली. ही घटना धामणगाव रोडवरील शुक्ला डेली निड्स समोर घडली. फिर्यादी आसीफ आवेज निर्वान (२३, रा. गिलाणी उद्यान) आणि त्याचा मित्र सोहेल खान यांच्याशी आरोपी शुभम, ओम आणि एका अज्ञात तरुणाने वाद घातला. आरोपींनी सोहेलला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच हातातील लोखंडी कड्याने डोक्यावर मारून व वीट फेकून जखमी केले. आरोपींनी जीवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकी लंपास

**यवतमाळ** : शासकीय रुग्णालयातील एटीएम समोर उभी केलेली २० हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना २६ डिसेंबरच्या रात्री घडली. फिर्यादी भारत दगडू रामगडे (३१, रा. गोधणी) यांनी आपली एमएच ३१ एआर ८२१० क्रमांकाची दुचाकी तेथे उभी केली होती. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकी चोरी

**बाभूळगाव :** यवतमाळकडे जाणाऱ्या रोडवर कॅनॉल जवळ उभी केलेली ६० हजार रुपयांची दुचाकी चोरीला गेली. फिर्यादी विष्णूजी देवानंद कुजरकार (३९) यांनी आपली हिरो स्प्लेंडर (एमएच २९ यु १०२८) तेथे उभी केली होती. अज्ञात चोरट्याने ती पळवून नेली. याप्रकरणी बाभूळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकी लांबवली

**आर्णी :** हॉटेल अंबा प्राईडच्या उत्तरेस १ किमी अंतरावरून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली. ही घटना १ डिसेंबर रोजी घडली होती, मात्र आता गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी संदीप उत्तम चव्हाण (३१, रा. वडगाव) यांची हिरो स्प्लेंडर प्लस (एमएच २९ एवाय ८२५७) चोरीला गेली आहे. याप्रकरणी आर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

### पिकअप वाहन जप्त

**पांढरकवडा :** विनापरवाना रेती वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनावर महसूल विभागाने कारवाई केली. पांढरकवडा ते केळापूर टोल नाका दरम्यान ही कारवाई करण्यात आली. आरोपी वसीम खान पठाण (३८, रा. राणाप्रताप वार्ड) हा आपल्या पिकअप वाहनातून (एमएच ३७ एए ३११७) अर्धा ब्रास रेतीची चोरटी वाहतूक करताना आढळला. त्याच्यावर पांढरकवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'नो रिलेटिव्ह' धोरणाला नार्वेकर कुटुंब अपवाद

## भाजपाकडून एकाच घरात तिघांना उमेदवारी; विधानसभा अध्यक्षांनी दिले स्पष्टीकरण

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पारदर्शकता आणि सामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी भाजपने 'आमदार-खासदारांच्या नातेवाईकांना तिकीट नाही' असे कडक धोरण जाहीर केले होते. मात्र, दक्षिण मुंबईच्या राजकारणात हे धोरण शिथिल झाल्याचे दिसत आहे. भाजपचे कद्दावर नेते आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या घरातील चक्क तीन सदस्यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. या निर्णयामुळे पक्षात आणि राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू झाल्यावर खुद्द राहुल नार्वेकर यांनी या उमेदवारीवर स्पष्टीकरण दिले आहे.

आपल्या कुटुंबाला मिळालेल्या उमेदवारीवर टीका करणाऱ्यांना राहुल नार्वेकर यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, "ज्यांना उमेदवारी मिळाली आहे, ते कोणीही पॅराशूट उमेदवार नाहीत. त्यांनी गेल्या १०-१५ वर्षांपासून जमिनीवर राहून लोकांसाठी काम केले आहे. लोकांचा त्यांच्या कामावर विश्वास आहे आणि मतदारांनी त्यांना स्वीकारले आहे. केवळ नातेवाईक आहेत म्हणून नव्हे, तर त्यांच्या कामाच्या जोरावर त्यांना पक्षाने पुन्हा संधी दिली आहे."राहुल नार्वेकर यांचे बंधून मकरंद नार्वेकर यांना भाजपने प्रभाग क्रमांक २२६ मधून पुन्हा संधी दिली आहे. मकरंद नार्वेकर यांच्या पत्नी हर्षिता यांना प्रभाग क्रमांक २२७ मधून रिंगणात उतरवण्यात आले आहे. तर, राहुल नार्वेकर यांच्या चुलत भगिनी गौरवी यांना प्रभाग क्रमांक २२५ मधून भाजपने उमेदवारी दिली आहे. स्वतः राहुल नार्वेकर हे कुलाबा मतदारसंघाचे आमदार असून सलग दुसऱ्यांदा विधानसभा अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत. अशा स्थित्तीत एकाच कुटुंबात चार पदे गेल्याने चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या उपस्थितीतच तिन्ही उमेदवारांनी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आपला अर्ज दाखल केला. नाशिकमध्ये आमदार देवयानी फरांदे आणि सीमा हिरे यांच्या मुलांचे अर्ज पक्षाने मागे घ्यायला लावले, तर कोल्हापुरात खासदार धनंजय महाडिक यांच्या मुलालाही संधी नाकारण्यात आली. मात्र, मुंबईत नार्वेकर कुटुंबासाठी हा नियम शिथिल केल्याने "पक्ष एकाला एक आणि दुसऱ्याला वेगळा न्याय का लावत आहे?" असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### भाजपमध्ये तिकीट वाटपावरून उमेदवारांची नाराजी

**• दरम्यान, मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारी रोजी निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होईल. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख होती. सत्ताधारी महायुतीत विशेषतः भाजपमध्ये तिकीट वाटपाच्या मुद्यावरून संतापाच्या लाटा उसळत आहेत. उमेदवार यादीत आपले नाव नसल्याचे पाहताच या इच्छुकांनी भाजपच्या नेत्यांवर तोंडसूख घेतले. यावेळी त्यांची रडारडही सुरू होती. यात काही महिला इच्छुकांचाही समावेश होता. नाशिक भाजपमध्येही प्रचंड नाराजी समोर आली आहे. तिकीट नाकारल्याने अनेक इच्छुक नाराज झालेत. त्यांनी आपला संताप व्यक्त केला. तर 'एबी' फॉर्मसाठी काही इच्छुकांनी शहराध्यक्षांचा पाठलाग केला. निष्ठावंतांना डावलल्याचा आरोप होतोय. नाशिक-मुंबई महामार्गावर शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या गाडीचा इच्छुकांनी पाठलाग केला.**

# अजित दादांकडून आणखी एका गुन्हेगाराला तिकीट, हत्या प्रकरणात जामिनावर असलेल्या बापू नायरला उमेदवारी

बातमी जगत | प्रतिनिधी



**पुणे :** महापालिकेच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून दिवसभर झालेल्या 'एबी' फॉर्मच्या वाटपात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना मिळालेल्या संधीमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. कुख्यात गजा मारणेची पत्नी आणि आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी सोनाली व लक्ष्मी आंदेकर यांना उमेदवारी दिल्यानंतर, आता दीपक मारटकर हत्या प्रकरणातील जामीनावर असलेला आरोपी बापू ऊर्फ या कुमार प्रभाकर नायर यालाही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने प्रभाग क्रमांक 39 मधून मैदानात उतरवले आहे.

गुन्हेगारांना टायरमध्ये घालू, अशा आक्रमक वल्गना करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिका निवडणुकीत मात्र आपली सर्व तत्त्वे धाब्यावर बसवल्याचे चित्र दिसत आहे. पुण्याला गुन्हेगारीमुक्त करण्याचे स्वप्न दाखवणाऱ्या पालकमंत्र्यांनी राजकीय फायद्यासाठी चक्क कुख्यात टोळ्यांशी संबंधित व्यक्तींना उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे अजित पवारांच्या शब्दांत आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी तफावत असल्याचे स्पष्ट झाले असून, निवडणुकीच्या रिंगणात 'तत्वे' बाजूला ठेवून केवळ 'निवडून येण्याची क्षमता' या निकषावर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना झुकते माप देण्यात आल्याचे दिसत आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक 23 मधून आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी सोनाली आणि लक्ष्मी आंदेकर यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाने उमेदवारी दिली असून, या दोघी आता जेलमधूनच निवडणूक लढवणार आहेत. यासोबतच कुख्यात गजा मारणे याच्या पत्नीलाही उमेदवारी देऊन पवारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या घराण्यांवर सढळ हाताने मेहेरनजर दाखवली आहे. एका बाजूला गुन्हेगारांविरुद्ध कठोर भाषेचा वापर करायचा आणि दुसऱ्या बाजूला त्यांनाच उमेदवारी देऊन राजकीय प्रतिष्ठा मिळवून द्यायची, अशा दुटप्पी भूमिकेमुळे 'पालकमंत्री' म्हणून अजित पवारांच्या विश्वासार्हतेवर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# अजित पवारांची दुटप्पी भूमिका?:गुन्हेगारी मुक्तीच्या वल्गना आणि जेलमधील आरोपींना 'एबी' फॉर्म

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** गुन्हेगारांना टायरमध्ये घालू, अशा आक्रमक वल्गना करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिका निवडणुकीत मात्र आपली सर्व तत्त्वे धाब्यावर बसवल्याचे चित्र दिसत आहे. पुण्याला गुन्हेगारीमुक्त करण्याचे स्वप्न दाखवणाऱ्या पालकमंत्र्यांनी राजकीय फायद्यासाठी चक्क कुख्यात टोळ्यांशी संबंधित व्यक्तींना उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे अजित पवारांच्या शब्दांत आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी तफावत असल्याचे स्पष्ट झाले असून, निवडणुकीच्या रिंगणात 'तत्वे' बाजूला ठेवून केवळ 'निवडून येण्याची क्षमता' या निकषावर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना झुकते माप देण्यात आल्याचे दिसत आहे.

पुण्यातील प्रभाग क्रमांक 23 मधून आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी सोनाली आणि लक्ष्मी आंदेकर यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाने उमेदवारी दिली असून, या दोघी आता जेलमधूनच निवडणूक लढवणार आहेत. यासोबतच कुख्यात गजा मारणे याच्या पत्नीलाही उमेदवारी देऊन पवारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या घराण्यांवर सढळ हाताने मेहेरनजर दाखवली आहे. एका बाजूला गुन्हेगारांविरुद्ध कठोर भाषेचा वापर करायचा आणि दुसऱ्या बाजूला त्यांनाच उमेदवारी देऊन राजकीय प्रतिष्ठा मिळवून द्यायची, अशा दुटप्पी भूमिकेमुळे 'पालकमंत्री' म्हणून अजित पवारांच्या विश्वासार्हतेवर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेपेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरवत महायुतीमध्ये स्वतःचे वजन वाढवले आहे. राष्ट्रवादीने मुंबईत एकूण 96 उमेदवार उभे केले असून शिंदे सेनेचे 90 उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. राष्ट्रवादीच्या या 96 उमेदवारांमध्ये 56 मराठी, 23 मुस्लिम, 11 उत्तर भारतीय, 3 ख्रिश्चन, आणि तेलगू, तमिळ व बोहरा मुस्लिम समाजाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश करून 'सोशल इंजिनिअरिंग' साधण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे, पक्षाने पुरुषांच्या तुलनेत महिलांना (50 महिला, 46 पुरुष) झुकते माप दिले असून, यात 12 अनुसूचित जाती आणि 17 ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना संधी देत सर्वसमावेशक चेहरा देण्याचा प्रयत्न केला आहे.

# लढणार तर 'कमळ' चिन्हावरच: भाजप नेत्या अक्षता तेंडुलकरांची निवडणुकीतून माघार

बातमी जगत | प्रतिनिधी



**पुणे :** भाजप नेत्या अक्षता तेंडुलकर यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीतून माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. वॉर्ड क्रमांक 192 मधून निवडणूक लढवण्यासाठी त्या इच्छुक होत्या, मात्र हा वॉर्ड महायुतीमध्ये शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने पेच निर्माण झाला होता. शिवसेनेने तेंडुलकर यांना त्यांच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढण्याची अधिकृत ऑफर दिली होती. परंतु, 'कमळ' या आपल्या मूळ चिन्हाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही चिन्हावर निवडणूक लढवण्यास त्यांनी ठाम नकार दिला आणि पक्षाशी निष्ठा राखत निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट करत निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले.अक्षता तेंडुलकर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले की, एकमेव ओपन कॅटेगरीत असलेल्या वॉर्ड क्रमांक १९२ मधून निवडणूक लढवण्यास मी इच्छुक होते, काल दुपारपर्यंत भाजपच्या नेत्यांनी हा वॉर्ड भाजपला लढवण्यास मिळावा यासाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र महायुतीच्या निर्णयानुसार हा वॉर्ड शिवसेनेला मिळाला. एक स्ट्राँग उमेदवार म्हणून शिवसेनेकडून मला हा वॉर्ड लढवण्यासाठी दुपारी ऑफर आली. त्यानुसार काही वरिष्ठांशी चर्चा करून या प्रयोगाविषयी चाचपणी करण्यात आली. याला अनुसरून काल आम्हाला सायंकाळी एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन बंगल्यावर बोलावण्यात आले होते, त्यानुसार आम्ही तिथे भेट दिली.

# नागपुरात महाविकास आघाडीत मोठी फूट

## काँग्रेसने रात्री 3 वाजता युती तोडल्याचा अनिल देशमुखांचा आरोप; राष्ट्रवादीकडून 'एबी' फॉर्मचे वाटप

बातमी जगत | प्रतिनिधी



**नागपूर :** महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नागपुरात महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडले आहे. जागावाटपाच्या अनेक फेऱ्यांनंतर अखेरच्या क्षणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यातील युती तुटल्याचे स्पष्ट झाले आहे. माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांनी काँग्रेसवर जाणीवपूर्वक दगाबाजी केल्याचा गंभीर आरोप करत, आता आमचा पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून नागपुरात काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यात आघाडीबाबत चर्चा सुरू होती. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना प्रत्येकी 12 ते 15 जागा सोडण्याचे संकेत देण्यात आले होते. गेल्या निवडणुकीतील मतांची टक्केवारी आणि निवडून आलेले नगरसेवक या निकषांवर जागावाटप निश्चित झाल्याचा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला होता. मात्र, अर्ज भरण्याच्यां शेवटच्या दिवशी काँग्रेसने अचानक माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घडामोडींवर संताप व्यक्त करताना अनिल देशमुख म्हणाले की, गेल्या चार-पाच दिवसांपासून सकारात्मक चर्चा सुरू होती. अगदी काल रात्रीपर्यंत जागांची यादी अंतिम झाली होती आणि दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या त्यावर स्वाक्षऱ्याही झाल्या होत्या. मात्र, काँग्रेसने रात्री 3 वाजता अचानक आणि एकतर्फी युती तोडल्याचा संदेश दिला. हे सर्व नियोजनबद्ध पद्धतीने आणि आम्हाला अडचणीत आणण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आले आहे. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आता आक्रमक झाली आहे. आघाडी तुटल्याचे स्पष्ट होताच पक्षाने आपल्या इच्छुक उमेदवारांना तातडीने 'एबी' फॉर्मचे वाटप करून स्वतंत्रपणे अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, या बिघाडीमुळे केवळ राष्ट्रवादीच नव्हे, तर शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काँग्रेसची शिवसेनेसोबतची युती अद्याप टिकून आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही.

# मीरा-भाईंदरमध्ये धक्कादायक घटना:अजित पवारांच्या उमेदवाराचा मृत्यू तर भाजपच्या महिला नेत्याला हृदयविकाराचा झटका

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई :** राज्यातील 29 महानगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय घडामोडींना वेग आलेला असतानाच, मीरा-भाईंदरमध्ये दोन अत्यंत धक्कादायक घटना समोर आल्या आहेत. एबी फॉर्म मिळवण्यासाठी आणि अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची प्रचंड झुंबड उडालेली असतानाच, मिरा रोड येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या एका उमेदवाराचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. याच तणावपूर्ण वातावरणात भाईंदरमध्ये भाजपच्या माजी महिला जिल्हाध्यक्ष वनिता बने यांनाही हृदयविकाराचा झटका आल्याने खळबळ उडाली आहे. निवडणूक अर्जाच्या शेवटच्या दिवशी झालेल्या या दुःखद घटनांमुळे मीरा-भाईंदरमधील राजकीय वर्तुळावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आपली कन्या श्रद्धा बने हिला भाजपकडून उमेदवारी नाकारली गेल्याच्या धक्क्याने माजी महिला जिल्हाध्यक्ष वनिता बने यांची प्रकृती खालावली असून त्यांना तातडीने मिरा रोड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असली, तरी रुग्णालयातून त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया अत्यंत भावूक होती. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाशी असलेली निष्ठा आणि पक्षकार्यासाठी अंगावर घेतलेले खटले यांचा विचार न करता, ऐनवेळी डावलले गेल्याची भावना त्यांनी अश्रू अनावर होत व्यक्त केली. पक्षासाठी आयुष्य वेचूनही आज आपल्याकडे दुर्लक्ष झाले, अशा शब्दांत त्यांनी आपली खंत बोलून दाखवली. मीरा-भाईंदरमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची युती अखेर अधिकृतरीत्या तुटली असून, यावरून दोन्ही पक्षांतील वाद आता चव्हाट्यावर आला आहे. भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी युती तुटल्याची घोषणा केल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेऊन मेहता यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. नरेंद्र मेहता यांचा अहंकार आणि घमेंडीमुळेच ही युती तुटली आहे. भाजपला सुरुवातीपासूनच शिवसेनेला सोबत घ्यायचे नव्हते. शहरात स्वतःचेच वर्चस्व राखणे आणि शिवसेनेला सातत्याने कमी लेखणे हीच भाजपची रणनीती होती, असा गंभीर आरोप सरनाईक यांनी केला. युतीसंदर्भातील चर्चेचा तपशील सांगताना सरनाईक यांनी भाजपच्या वागणुकीवर तीव्र संताप व्यक्त केला. चर्चेसाठी बोलावून आपल्याला तब्बल 50 मिनिटे ताटकळत ठेवले गेले आणि केवळ 13 जागांची अपमानास्पद ऑफर देण्यात आली, असा दावा त्यांनी केला. शिवाय, भाजपने सहकार्य केले तरच तुमच्या या 13 जागा निवडून येतील, असे अहंकारपूर्ण विधान करून शिवसेनेचा अपमान करण्यात आल्याचेही ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर, शिवसेनेने आता स्वतंत्रपणे लढण्याचा पवित्रा घेतला असून मीरा-भाईंदर महापालिकेच्या 95 पैकी 81 जागांवर शिवसेना आपले उमेदवार उतरवणार असल्याची घोषणा प्रताप सरनाईक यांनी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आपली कन्या श्रद्धा बने हिला भाजपकडून उमेदवारी नाकारली गेल्याच्या धक्क्याने माजी महिला जिल्हाध्यक्ष वनिता बने यांची प्रकृती खालावली असून त्यांना तातडीने मिरा रोड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असली, तरी रुग्णालयातून त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया अत्यंत भावूक होती. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाशी असलेली निष्ठा आणि पक्षकार्यासाठी अंगावर घेतलेले खटले यांचा विचार न करता, ऐनवेळी डावलले गेल्याची भावना त्यांनी अश्रू अनावर होत व्यक्त केली. पक्षासाठी आयुष्य वेचूनही आज आपल्याकडे दुर्लक्ष झाले, अशा शब्दांत त्यांनी आपली खंत बोलून दाखवली.

# भाजपची नातेवाईकांना तिकीट न देण्याची घोषणा कागदावरच!: नार्वेकरांच्या कुटुंबात तिघांना उमेदवारी

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई** : मुंबई महानगरपालिका निवडणुकीत आमदार-खासदारांच्या नातेवाईकांना तिकीट नाकारण्याची घोषणा भाजपने केली असली, तरी प्रत्यक्षात मात्र पक्षाला मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बंडखोरीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याच कुटुंबात तब्बल तीन जणांना उमेदवारी देण्यात आली असून, त्यांचे बंधू मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता नार्वेकर आणि चुलत बहीण गौरवी शिवलकर-नार्वेकर रिंगणात आहेत. याव्यतिरिक्त भाजप नेते प्रवीण दरेकर यांचा भाऊ आणि मुंबई भाजप अध्यक्षांच्या मेहुण्यालाही तिकीट मिळाल्याने, स्वतःचेच नियम धाब्यावर बसवणाऱ्या भाजपविरोधात कार्यकर्त्यांमध्ये आता नाराजीचा सूर उमटत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत अनेक ठिकाणी बंडखोरी उफाळून आल्याने महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. वॉर्ड क्रमांक 225 मध्ये भाजपच्या हर्षिता नार्वेकर यांच्यासमोर शिवसेनेच्या सुजाता सानप यांचे आव्हान असतानाच, आता भाजपचे मुंबई उपाध्यक्ष कमलाकर दळवी यांनीच बंडखोरी करत शड्डू ठोकल्याने नार्वेकर यांच्या मतांच्या विभाजनाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. केवळ वॉर्ड 225 मध्येच नव्हे, तर प्रभाग क्रमांक 7 मध्येही शिवसेनेचे भूपेंद्र काशिनाथ कवळी यांनी बंडखोरी केल्याने तेथील भाजप उमेदवारासमोर पेच निर्माण झाला असून, मुंबईतील अशा वाढत्या बंडखोरीमुळे राजकीय गणिते बिघडण्याची चिन्हे दिसत आहेत. गोरेगाव आणि चेंबूरमध्येही बंडखोरीचा फटका गोरेगाव आणि चेंबूरमध्येही भाजपला मोठ्या बंडखोरीचा फटका बसला आहे. गोरेगावच्या प्रभाग क्रमांक 54 मध्ये उमेदवारी न मिळाल्याने संतापलेले भाजप महामंत्री संदीप जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत अपक्ष अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे, चेंबूरमधील वॉर्ड क्रमांक 155 मध्ये अवघ्या दोन दिवसांपूर्वी ठाकरे गटातून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या श्रीकांत शेटे यांना तिकीट देण्यात आल्याने 'आयात' उमेदवारांविरुद्ध निष्ठावंत कार्यकर्त्यांनी बंडाचे निशाण फडकवले आहे. शेटे यांच्या उमेदवारीमुळे नाराज झालेल्या भाजपच्या तीन इच्छुक उमेदवारांनी बंडखोरी केल्याने जुन्या कार्यकर्त्यांमधील असंतोष आता चव्हाट्यावर आला असून, यामुळे भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या अडचणींत मोठी वाढ झाली आहे. भाजपमधील बंडखोरीचे सत्र सुरूच असून आता घाटकोपर आणि चेंबूरमध्येही निष्ठावंतांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. चेंबूरमध्ये उमेदवारी न मिळाल्याने माजी नगरसेविका जयश्री खरात, हर्षा साळवे आणि शशिकला कांबळे यांनी अपक्ष अर्ज भरून पक्षाला आव्हान दिले आहे. तसेच, घाटकोपर वॉर्ड क्रमांक 29 मध्ये शिवसेनेतून भाजपमध्ये आलेल्या माजी नगरसेविका अश्विनी मते यांना उमेदवारी दिल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या निर्णयाचा निषेध म्हणून भाजपचे माजी नगरसेवक सूर्यकांत गवळी यांच्या भावजय सुरेखा गवळी आणि पदाधिकारी प्रकाश पाटील यांच्या पत्नी मालती पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आयात उमेदवारांना झुकते माप दिल्यामुळे निष्ठावंतांनी पुकारलेल्या या बंडामुळे भाजपच्या अधिकृत उमेदवारांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत आमदार-खासदारांच्या नातेवाईकांना तिकीट नाकारण्याची घोषणा भाजपने केली असली, तरी प्रत्यक्षात मात्र पक्षाला मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बंडखोरीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याच कुटुंबात तब्बल तीन जणांना उमेदवारी देण्यात आली असून, त्यांचे बंधू मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता नार्वेकर आणि चुलत बहीण गौरवी शिवलकर-नार्वेकर रिंगणात आहेत. याव्यतिरिक्त भाजप नेते प्रवीण दरेकर यांचा भाऊ आणि मुंबई भाजप अध्यक्षांच्या मेहुण्यालाही तिकीट मिळाल्याने, स्वतःचेच नियम धाब्यावर बसवणाऱ्या भाजपविरोधात कार्यकर्त्यांमध्ये आता नाराजीचा सूर उमटत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

# अजित पवार गट-मनसे महायुती

बातमी जगत | प्रतिनिधी

**जालना** : राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत जालन्यात एक अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक राजकीय समीकरण पाहायला मिळत आहे. राज्याच्या राजकारणात वर्षानुवर्षे एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी राहिलेले पक्ष आणि घराणी जालन्यात एकत्र आली आहेत. जालना महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, राज ठाकरे यांची मनसे यांनी अभूतपूर्व युती जाहीर केली आहे.

जालना महापालिका अस्तित्वात आल्यानंतर होत असलेली ही पहिलीच निवडणूक असल्याने सर्वच पक्षांनी प्रतिष्ठेची बनवली आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने महायुतीतून बाहेर पडत सर्वांना धक्का दिला. भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांनी स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्यावर अजित पवार गटाने तातडीने मनसे आणि वंचित बहुजन आघाडीशी संधान साधले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आणि मनसेच्या जिल्हाध्यक्षांनी या नव्या आघाडीची अधिकृत घोषणा केली आहे. या नव्या आघाडीत जागावाटपाचे समीकरणही स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट 50 जागांवर आपले उमेदवार उतरवणार असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला 6 जागा देण्यात आल्या आहेत. पहिल्या महापौराच्या खुर्चीवर आपलाच झेंडा फडकवण्यासाठी या दोन्ही पक्षांनी कंबर कसली आहे. राज्यातील 29 महापालिकांमध्ये स्थानिक नेत्यांना निर्णयाचे स्वातंत्र्य दिल्यामुळे अनेक ठिकाणी कुठे शत्रू तर कुठे मित्र असे चित्र दिसत आहे. जालन्यात मात्र भाजप आणि शिंदे सेना स्वतंत्र लढत असल्याने आणि अजित पवार गट नव्या मित्रांसोबत मैदानात उतरल्याने ही निवडणूक चौरंगी आणि चुरशीची ठरणार आहे. जालन्याच्या पहिल्या महापौरपदाचा मान कोणाला मिळणार आणि हे 'अजित पवार-राज ठाकरे' हे समीकरण यशस्वी ठरणार का, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

# भक्ती, प्रवचन आणि कीर्तनाच्या साक्षीने सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांचा २३ वा पुण्यतिथी उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी



**दे. राजा** : ह.भ.प. प.पू. सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या २३ व्या पुण्यतिथीनिमित्त एकदिवसीय पुण्यतिथी उत्सव आदर्श कॉलनी येथील संत सेनाजी महाराज सामाजिक सभागृहाच्या प्रांगणात दि. २९ डिसेंबर रोजी अत्यंत भक्तिमय, शांत व आध्यात्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा पुण्यतिथी सोहळा ह.भ.प. गुरुवर्य डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांच्या पावन आशीर्वादाने तसेच ह.भ.प. गंभीर गुरुजी यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच सभागृह परिसरात वारकरी संप्रदायाचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद आणि "नामस्मरणाचा" अखंड प्रवाह सुरू होता. कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प. संतचरणदास निकम गुरुजी यांच्या प्रभावी प्रवचनाने झाली. आपल्या प्रवचनातून त्यांनी सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या जीवनकार्याचा, त्यागाचा, समाजप्रबोधनाचा आणि भक्तीमार्गाचा सखोल ऊहापोह केला. "सद्गुरूंचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत," असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यानंतर गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांचे भावस्पर्शी काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. भक्ती, विनोद आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर संगम असलेल्या या कीर्तनाने संपूर्ण वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. या प्रसंगी उत्सव समितीच्या वतीने ह.भ.प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष माधुरी शिंपणे, नवनिर्वाचित नगरसेवक व राजेंद्र खांडेभराड यांचाही मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला.या पुण्यतिथी उत्सवात परिसरातील तसेच तालुक्यातील वारकरी, टाळकरी, भजनी मंडळे आणि असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.हा संपूर्ण पुण्यतिथी सोहळा अत्यंत नियोजनबद्ध व भक्तिभावाने पार पडण्यासाठी ह.भ.प. देविदास खरात व गुरुवर्य रामचरणदास बाबा पुण्यतिथी उत्सव समिती, आदर्श कॉलनी, देऊळगांव राजा यांनी विशेष परिश्रम घेतले.सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा पुण्यतिथी उत्सव देऊळगांव राजा शहरासाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरला, अशी भावना भाविकांमधून व्यक्त होत होती.

# विद्यार्थ्यांचे शिक्षकांप्रती अनोखे प्रेम; डोणगाव जिल्हा परिषद शाळेत गुरुजींचा वाढदिवस उत्साहात साजरा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अनिल राठोड



**डोणगाव** : : "गुरु विण न मिळे ज्ञान, ज्ञान विण न होई जगी सन्मान..." या उक्तीप्रमाणे शिक्षकांचा दर्जा समाजात सर्वश्रेष्ठ आहे, हे आज जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, डोणगाव येथील इयत्ता चौथी 'ब' च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. शाळेतील आदर्श शिक्षक श्री. असलम अली शाह यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांनी स्वतःचे पैसे जमा करून शालेय परिसरात त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आपुलकीने साजरा केला. श्री. असलम अली शाह हे पंचायत समिती मेहकर अंतर्गत येणाऱ्या डोणगाव शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. एक धडपडीचे आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. आपल्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ते अहोरात्र मेहनत घेतात. त्यांच्या याच जिद्दीमुळे आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या प्रेमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराचे स्थान निर्माण झाले आहे. ३० डिसेंबर रोजी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, चौथी 'ब' च्या विद्यार्थ्यांनी अनोखा उपक्रम राबवला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खाऊचे पैसे साठवून शाळा सजवली, फळ्यावर आकर्षक सजावट करून आपल्या लाडक्या शिक्षकांसाठी शुभेच्छा संदेश लिहिले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांचे विद्यार्थ्यांवर असलेले प्रेम आणि विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूसाठी दिलेला हा सन्मान पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. "शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर ते विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवतात," याचे जिवंत उदाहरण आज या निमित्ताने पाहायला मिळाले. या आगळ्यावेगळ्या वाढदिवसाची चर्चा संपूर्ण परिसरात होत असून, विद्यार्थ्यांनी जोपासलेल्या या गुरु-शिष्य परंपरेचे कौतुक केले जात आहे.

# इस्क्रा फाउंडेशन तर्फे कोठारे आश्रम शाळेत एकदिवसीय कलाविकास कार्यशाळा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे




**ठाणे** : इस्क्रा फाउंडेशनतर्फे शहापूर तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कोठारे येथे एकदिवसीय कलाविकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

इस्क्रा फाउंडेशन ही संस्था शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, पर्यावरण संवर्धन तसेच समाजविकास या क्षेत्रात कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने उपक्रम राबवित आहे. या कार्यशाळेत पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी संगीत, नाटक, कथाकथन व वक्तृत्व या कला प्रकारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर संवाद साधण्यात आला. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसोबत खेळ व गाण्यांच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच इस्क्रा फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. हा उपक्रम घेण्याची संधी पंढरीनाथ वेखंडे यांनी दिली. शहापूर प्रकल्प व्यवस्थापक श्वेता पाटील व सचिव प्रगती कांबळे यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते

# पत्रकार समाधान पदमणे यांना 'राष्ट्रसंत गाडगेबाबा समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत





**साखरखेर्डा** : पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत, दैनिक बातमी जगतचे उपसंपादक (अंजनी बु. ) (तथा सामाजिक कार्यकर्ते समाधान पदमणे यांना यावर्षीचा प्रतिष्ठित 'राष्ट्रसंत गाडगेबाबा समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. भव्य पुरस्कार सोहळा दैनिक भास्कर संग्राम आयोजित हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा ३० डिसेंबर रोजी अनिकेत सैनिकी स्कूल, साखरखेर्डा येथे उत्साहात पार पडला. वृक्षमित्र स्व. मधुकरराव खंडारे यांचा द्वितीय स्मृतिदिन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आणि समाजभूषण अर्जुनराव गवई यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ५५ मान्यावरांमध्ये निवड मुख्य आयोजक पत्रकार सचिन खंडारे आणि निवड समिती अध्यक्ष विकास सुखदाणे यांनी राज्यभरातून प्रस्तावांचे आवाहन केले होते. आलेल्या शेकडो प्रस्तावांमधून केवळ ५५ व्यक्तींची त्यांच्या विशेष कार्यासाठी निवड करण्यात आली, ज्यामध्ये समाधान पदमणे यांच्या नावाचा समावेश होता. पदमणे हे मानव सुरक्षा सेवा ट्रस्टचे महाराष्ट्र मीडिया प्रमुख म्हणूनही कार्यरत आहेत. मान्यवरांची उपस्थिती हा सोहळा अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यामध्ये प्रामुख्याने रविकांत तुपकर (शेतकरी नेते) प्रा. संजय खडसे (उपजिल्हाधिकारी, सिंदखेड राजा) गजानन करडेवार (ठाणेदार) प्रियंका काळे (RTO अधिकारी) भाई कैलास सुखदाणे (राज्य सरचिटणीस, भीमशक्ती) योगेश जाधव (युवा नेते)अर्जुनराव गवई (अध्यक्ष, अनिकेत सैनिक स्कूल) भाई दिलीप खरात (जिल्हाध्यक्ष, रिपाइं) यावेळी मान्यवरांनी समाधान पदमणे यांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि निर्भीड पत्रकारितेचे कौतुक केले. या पुरस्काराबद्दल मेहकर तालुक्यासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक सचिन खंडारे, विकास सुखदाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मोबाईलच्या दुनियेत आई-वडिलांशी संवाद हरवला


## घराला घरपण देण्यासाठी 'स्क्रीन' सोडा, 'माणसं' जोडा



कैलास राऊत
मुख्य संपादक

आज आपण आलिशान फ्लॅटमध्ये राहतो, महागडे मोबाईल वापरतो आणि सोशल मीडियावर हजारो मित्रांशी गप्पा मारतो. पण याच घरात एका कोपऱ्यात बसलेले आपले वृद्ध आई-वडील आपल्याकडे आशेने पाहत असतात. त्यांना तुमचे पैसे नकोत, त्यांना तुमच्या हॉटेलमधील पार्ट्या नकोत त्यांना हवा आहे फक्त तुमचा थोडासा 'वेळ' आणि तुमच्याशी मारलेल्या दोन 'गप्पा'. पैसे असूनही 'अनाथ' वाटणारी पिढी अनेक मुलं आपल्या पालकांसाठी औषधं वेळेवर आणतात, त्यांना फिरायला नेतात, घराचे हप्ते भरतात. पण हे सगळं करताना ते विसरतात की, आई-वडिलांना पैशांच्या पाकिटापेक्षा आपल्या मुलाने जवळ बसून विचारलेलं "आई, आज तुझा दिवस कसा गेला?" हे शब्द जास्त सुख देतात. आजची पिढी व्हॉट्सॲपवर स्टेटस ठेवण्यात व्यस्त आहे, पण शेजारी बसलेल्या वडिलांशी बोलायला त्यांच्याकडे वेळ नाही.





**बदलत्या जीवनशैलीचा फटका**

घरात असतानाही प्रत्येक जण स्वतःच्या मोबाईलमध्ये गुंतलेला असतो. यामुळे एकाच छताखाली राहूनही कुटुंबात संवाद उरलेला नाही.आई-वडिलांच्या वाढदिवसाला महागड्या भेटवस्तू दिल्या जातात, पण त्यांच्या जुन्या आठवणी ऐकून घेण्याची कुवत आता तरुण पिढीत उरलेली नाही. जरी आपण पालकांना सोबत ठेवत असलो, तरी संवाद नसल्यामुळे त्यांना घरातच 'वृद्धाश्रमा'सारखे एकटेपण जाणवू लागते.

**एका छोट्या बदलाची गरज**

दिवसातला किमान अर्धा तास मोबाईल बाजूला ठेवून पालकांशी बोला. त्यांना त्यांच्या लहानपणीचे, तरुणपणीचे किस्से विचारा. "तुम्हाला काही कळत नाही" किंवा "तुमचा काळ वेगळा होता" असे म्हणून त्यांना बाजूला सारण्यापेक्षा, त्यांच्या अनुभवाचा सन्मान करा. सणासुदीला फोटो काढून पोस्ट करण्यापेक्षा, तो सण त्यांच्यासोबत आनंदाने साजरा करा. **आजचा विचार...** लक्षात ठेवा, उद्या आपणही वृद्ध होणार आहोत. आपण आपल्या पालकांशी जसे वागतो, तसेच आपली मुलं आपल्याशी वागणार आहेत. आई-वडिलांच्या पाया पडणे ही संस्कार आहे त्यांच्याशी प्रेमाने बोलणे हीच खरी 'भक्ती' आहे. आई-वडिलांच्या डोळ्यांतील पाणी पुसण्यासाठी हाताची नाही, तर काळजाच्या ओढीची गरज असते.

# संभाजीनगर भाजप कार्यालयात 'हायव्होल्टेज ड्रामा'

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई** : तिकीट कापल्यामुळे नाराज असणाऱ्या प्रभाग क्र.20, गादीया विहारच्या भाजप कार्यकर्त्या यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. पक्षाच्या सर्वेक्षणात नाव असताना निष्क्रीय कार्यकर्त्याला तिकीट देण्याचा जाब त्यांनी विचारला. आता स्विकृत नगरसेवक पदावर नियुक्तीचे लेखी आश्वासन दिल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी छत्रपती संभाजीनगरच्या भाजप प्रचार कार्यालयात हाय व्होल्टेज ड्रामा झाला. याबाबत पक्षश्रेष्ठींना जाब विचारण्यासाठी प्रचार कार्यालय गाठले. यावेळीच त्यांनी तिकीट मिळेपर्यंत उपोषणाचा इशारा दिला होता. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची 3 वाजेची वेळ संपल्यावर भाजप कार्यालयात शुकशुकाट होता. मात्र, दिव्या मराठे एकट्याच येथे उपस्थित होत्या. कार्यालयातील स्टेजवर असणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याखाली सतरंजी टाकून त्यांनी उपोषणाला सुरूवात केली. दिवसभरात मंत्री अतुल सावे, खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, शहराध्यक्ष किशोर शितोळे किंवा अन्य कोणाकडूनही फोन आला नाही. कोणी विचारणा केली नाही. मुंबईहून प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या कार्यालयातून विचारणा झाली. मात्र, स्विकृत नगरसेवक म्हणून संधी देण्याचे लेखी आश्वासन दिल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचे त्यांनी सांगितले. रात्री 10 वाजेपर्यंत त्यांचे उपोषण सुरू होते. वर्षांपासून भाजपमध्ये कार्यरत आहे. अतुल सावे यांनी त्यांचे सर्वेक्षणात नाव आल्याचे सांगितले होते. मात्र, शितोळे नाव नसल्याचे सांगतात. पक्षातील नेत्यांमध्येच समन्वय नसल्याचा आरोप त्यांनी केला. 2010 मध्येही ऐनवेळी त्यांना एबी फॉर्म नाकारला होता. यावेळीही त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

## घटना - घडामोडी

### मुंबईत प्रकाश सुर्वेंना शिवसैनिकांनी दाखवले काळे झेंडे

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांना शिवसैनिकांकडून काळे झेंडे दाखवण्यात आले आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रभाग क्रमांक 3 भाजपला सोडल्याने नाराज शिवसैनिकांनी प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. मुंबई महापालिकेचा प्रभाग क्रमांक 3 मध्ये प्रकाश सुर्वे यांनी प्रकाश पुजारी यांना निवडणुकीसाठी तयारी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, ऐनवेळी हा वॉर्ड भाजप नेते प्रवीण दरेकर यांचे भाऊ प्रकाश दरेकर यांना सोडण्यात आला, यामुळे नाराज शिवसैनिकांनी आमदार प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात निदर्शने केली. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठीचा अर्ज भरण्यासाठी अवघा एक तास उरलेला असताना मागाठाणे विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटात असंतोष उफाळून आल्याचे पाहायला मिळाले. या मतदारसंघातील इच्छुक उमेदवार वैष्णवी पुजारी यांना डावलून बाहेरचा उमेदवार भाजपकडून लादण्यात आल्याने याचा निषेध करण्यासाठी शिंदे गटाचे शाखाप्रमुख प्रकाश पुजारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवत आमदार प्रकाश सुर्वे आणि उमेदवार प्रकाश दरेकर यांचा जोरदार निषेध नोंदवला. आमदार प्रकाश सुर्वे यांच्या मुलाच्या उमेदवारीसाठी इतर मतदारसंघात तडजोड करावी लागल्याने हा मतदारसंघ भाजपला गेल्याचा दावा प्रकाश पुजारी यांनी केला आहे. तसेच या ठिकाणी कार्यकर्त्यांना अंधारात ठेऊन वरिष्ठ नेत्यांनी बाहेरच्या उमेदवाराला उमेदवारी जाहीर केल्याचे वैष्णवी पुजारी यांनी म्हटले आहे. दहिसरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे यांच्याविरोधात शिवसैनिकांनी आक्रमक पवित्रा घेत जोरदार निदर्शने केली आहेत. वॉर्ड क्रमांक 3 मधून प्रकाश पुजारी यांच्या मुलीला उमेदवारी मिळण्याचे संकेत आमदार सुर्वे यांनी दिले होते आणि त्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचनाही केल्या होत्या. मात्र, ऐनवेळी ही जागा शिवसेनेऐवजी भाजपकडे गेल्याने संतापलेल्या पुजारी आणि त्यांच्या समर्थकांनी सुर्वे यांना काळे झेंडे दाखवून त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या वादाचे मुख्य कारण म्हणजे वॉर्ड क्रमांक 3 मधून भाजपने विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांचे भाऊ प्रकाश दरेकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.
मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीमध्ये झालेल्या जागावाटपानुसार, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला 90 जागा मिळाल्या आहेत, तर भाजप 137 जागांवर निवडणूक लढवणार आहे. या जागावाटपामुळे इच्छुक उमेदवार डावलले गेल्याने सध्या दहिसरमध्ये शिंदे गटातील अंतर्गत नाराजी उघडपणे समोर आली आहे.

### सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार ? :प्रकाश आंबेडकरांच्या विधानाने चर्चांना उधाण

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई:** राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या गदारोळात राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी महायुती तुटत असतानाच पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती फिस्कटल्याने वातावरण अधिकच तापले आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाच्या अगदी तोंडावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असे थेट भाकीत करत त्यांनी शरद पवारांकडून धक्कातंत्र वापरले जाईल, असे संकेत दिले. त्यामुळे महापालिका निवडणुकांपुरती मर्यादित असलेली चर्चा थेट राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचली आहे. महापालिका निवडणुकांमध्ये यंदा अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळत असून, राज्यातील 12 हून अधिक ठिकाणी महायुती कोलमडली आहे. भाजप आणि शिवसेना अनेक महानगरपालिकांमध्ये थेट एकमेकांविरोधात उभ्या ठाकणार आहेत. दुसरीकडे, पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती तुटल्याची अधिकृत घोषणा झाली आहे. जागावाटपावरून निर्माण झालेल्या मतभेदांमुळे ही युती फिस्कटल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यातील पाटीलकीमुळे आमचे आणि काँग्रेसचे पटले नाही, असे स्पष्ट करत प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीला स्वबळावर निवडणूक लढवण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे पुण्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत. युती तुटल्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी केवळ स्थानिक राजकारणापुरतीच भूमिका मांडली नाही, तर थेट केंद्रातील सत्ताकारणावर भाष्य करत एक मोठा बॉम्ब टाकला. सुप्रिया सुळे लवकरच केंद्र सरकारमध्ये मंत्री होतील, असे भाकीत करत त्यांनी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आणले. मुंबईत आमची आणि काँग्रेसची युती असल्यामुळे जर कोणी नाराज असेल, तर त्याची आम्हाला पर्वा नाही. आमच्यासाठी पक्ष महत्त्वाचा आहे, व्यक्ती नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे शरद पवार कोणता मोठा राजकीय निर्णय घेणार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यात काय घडणार, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रीपद मिळाल्यास राज्यातील सत्तासमीकरणांवर मोठा परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे. या चर्चांना आणखी हवा देणारे वक्तव्य काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. त्यांनी थेट दावा करत सांगितले की, उद्योगपती गौतम अदानी अलीकडेच बारामतीला येऊन गेले होते. अदानी यांच्या मध्यस्थीने शरद पवार हे लवकरच राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये, म्हणजेच एनडीएमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींना खासदारांची संख्या वाढवण्याची गरज आहे, तर दुसरीकडे शरद पवार यांच्याकडे आमदारांची संख्या मर्यादित आहे. त्यामुळे दोघांचे हितसंबंध एकमेकांशी जुळत असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला.

## पान १ वरील

वेब सिरीज आश्रममधून प्रेक्षकांमध्ये विशेष ओळख निर्माण करणारी अभिनेत्री त्रिधा चौधरी तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी, सशक्त भूमिकांसाठी आणि सातत्याने काम करण्याच्या वृत्तीसाठी ओळखली जाते. 2025 हे वर्ष तिच्या कारकिर्दीसाठी अनेक अर्थांनी अविस्मरणीय ठरले, जिथे तिने ओटीटीपासून ते चित्रपटांपर्यंत विविध प्रोजेक्ट्समध्ये आपली उपस्थिती नोंदवली. या विशेष संवादात त्रिधा चौधरीने गेल्या वर्षातील तिच्या यशाबद्दल, वैयक्तिक शिकवणीबद्दल, आगामी योजनांबद्दल आणि नवीन वर्षाबद्दलच्या तिच्या दृष्टिकोनाबद्दल मनमोकळेपणाने सांगितले. जर तुम्ही 2025 हे वर्ष व्यावसायिक आणि वैयक्तिक दोन्ही दृष्टिकोनातून पाहिले, तर हे वर्ष तुमच्यासाठी कसे राहिले? वर्ष 2025 माझ्यासाठी अनेक अर्थांनी खूप चांगले वर्ष राहिले आहे. आश्रम प्रदर्शित झाला, ज्याला प्रेक्षकांचे खूप प्रेम मिळाले. त्यानंतर दिल दोस्ती डॉग्स नावाचा एक चित्रपट आला, जो ओटीटीवर प्रदर्शित झाला. यात मी नीना गुप्तासोबत काम केले आहे.

# कामरगावातील शंकरपटात 'आनंदमहाकाल' अव्वल, ४ लाखांची जंगी लूट, शेकडो बैलजोड्यांचा सहभाग

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्हास ठाकरे



**कामरगाव :** ग्रामीण संस्कृतीचा अभिमान असलेल्या बैलगाडा शर्यतींचा थरार अनुभवण्यासाठी कामरगाव येथे एकता मंडळाच्या वतीने भव्य व जंगी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले होते. हा शंकरपट शुक्रवार, शनिवार व रविवार असे सलग तीन दिवस 26, 27 व 28 डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी पार्कच्या मागे, अमरावती–कारंजा महामार्गालगत पार पडला. या शंकरपटात अ गट, क गट तसेच गावगाडा गट अशा तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या असून, तब्बल 4 लाख रुपयांहून अधिक रकमेची जंगी बक्षिसे वितरीत करण्यात आली आहेत. अ गटासाठी प्रथम बक्षीस 51,111 रुपये, द्वितीय 31,111 रुपये तर तृतीय बक्षीस 21,111 रुपये. क गटासाठी प्रथम बक्षीस 31,111 रुपये, द्वितीय 21,111 रुपये आणि तृतीय 13,111 रुपये देण्यात आले. तसेच गावगाडा गटासाठी प्रथम बक्षीस 11,111 रुपये, द्वितीय 7,111 रुपये तर तृतीय 5,111 रुपये अशी रोख बक्षिसांची रेलचेल होती. या शंकरपटाचे उद्घाटन शुक्रवार, 26 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजता आ. सईताई प्रकाशदादा डहाके आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष श्रीधर पाटील कानकीरड यांच्या हस्ते करण्यात आले तर रविवार, 28 डिसेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता बक्षीस वितरण समारंभ पार पडला. तीन दिवसात या शंकरपटात शेकडो बैल जोड्यांनी सहभाग नोंदवला. अ गटात अभिजीत राठोड यांच्या आनंद महाकाल ही जोडी अव्वल ठरली. तर नसीम खा पठाण यांची देवा दुर्गा जोडी द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली. कैलास हिवाळे व युवराज पटेल यांची लाडक्या सोन्या तृतीय, कु. मिशू अन्विका बैतूल हिची कॅप्टन राजा चौथी, लोकेश पवार हरदा यांची शक्ती रॉकी पाचवी, अनिल भाऊराव काळे दुधाळा यांची बाजी मजनू सहावी, योगेश बाबूसिंग जाधव शिरपूर यांची बिरदू जाबर सातवी, प्रमोद पाटील दिवटे यांची फायटर मल्हार आठवी, नीतू तिवारी यवतमाळ यांची शिव मथूर नववी, केकान साहेब किनगाव यांची बबल्या देवा दहावी आणि कु. रिद्धी पराग अमरावती हिची कान्हाबाजी ही जोडी 11 व्या क्रमांकाची मानकरी ठरली. क गटात ताज खा जहागीर खा पठाण हिवरा यांची देवा सेवा ही जोडी पहिली आली तर शेख अदनान कोल्हापूर यांची रायफल भैरव ही जोडी दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली.तुषार शेठ डांगे यांची मन्या हरण्या तिसरी, मुकुंदराव हाके वारंगा यांची मन्या हरण्या चौथी, जीवन जाधव धोत्रा यांची नायक टायटन पाचवी, तनु सुधाकर खादवे यांची सैराट सर्जा सहावी, जीएसके ग्रुप नागपूर यांची डेव्हिड रॉकी सातवी, रोशन पाटील खडसे यांची सर्जा लखन आठवी, जगदंबा संस्थान शिवडी पुसद यांची बजरंगी बजरंग नववी, सोपीनाथ संस्थान चिखली यांची रॉकी इशारा दहावी आणि माऊली ग्रुप असदपूर यांची मल्हार सम्राट ही जोडी या स्पर्धेत अकराव्या क्रमांकाची मानकरी ठरली. गावगाडा गटात बजरंग शिंदे सेमलाई यांची करंट सागर ही जोडी पहिल्या क्रमांकाची मानकरी ठरली. तर विजय मारुती गिरी लाडेगाव यांची सोन्या मोन्या ही जोडी दुसरी आली.रणजीत काळे डोंगरगाव यांची करंट राजा तिसरी, राहुल गाढवे, कामरगाव यांची सरपंच गुरु चौथी, बांधीलकी ग्रुप कामरगाव यांची बजाज शंभू पाचवी, शंकरराव जोगी बेंबळा यांची त्रिशूल मालक सहावी,तर बांबर्डा येथील गोपाल भेंडे यांची सर्जा राजा नावाची जोडी या स्पर्धेत सातव्या क्रमांकाची मानकरी ठरली.शंकरपट यशस्वीपणे पार पाडण्यासाठी एकता मंडळाची कार्यकारिणी, पंचकमेटी व निर्णय समिती यांनी अहोरात्र मेहनत घेतली.

## रेखा चौधरी यांची बिनविरोध निवड निश्चित

बातमी जगत | प्रतिनिधी

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या प्रत्यक्ष मतदानापूर्वीच भाजपने विजयाचे खाते उघडत मोठी बाजी मारली आहे. प्रभाग क्रमांक 18 (अ) मधून भाजपच्या उमेदवार रेखा राजन चौधरी यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला असून, या विजयामुळे भाजप गोटात उत्साहाचे वातावरण आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला या आरक्षित जागेसाठी विहित मुदतीत केवळ रेखा चौधरी यांचाच एकमेव अर्ज दाखल झाला असून, इतर कोणत्याही पक्षाने किंवा अपक्ष उमेदवाराने येथून अर्ज भरलेला नाही. परिणामी, या प्रभागात निवडणूक न होताच भाजपने आपला पहिला विजय नोंदवला असून, अधिकृत घोषणेनंतर रेखा चौधरी या महापालिकेच्या पहिल्या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका ठरतील.
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदानापूर्वीच भाजपने विजयाचा श्रीगणेशा केला असून, प्रभाग क्रमांक 18 (अ) मधून भाजपचे खाते उघडले आहे. या प्रभागातील 'नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला' या राखीव जागेसाठी विहित मुदतीत केवळ रेखा राजन चौधरी यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याची अधिकृत माहिती निवडणूक अधिकारी वरुण कुमार सहारे यांनी दिली आहे. इतर कोणत्याही पक्षाने किंवा अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल न केल्यामुळे रेखा चौधरी यांची बिनविरोध निवड आता निश्चित झाली असून, निकालाआधीच मिळालेल्या या मोठ्या यशाचे श्रेय भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नांना आणि निवडणूक नियोजनाला दिले जात आहे.

## दे.राजा तालुक्यातील दे.मही परिसरात दिवसाढवळ्या फसवणूक, नागरिकांत भीतीचे वातावरण

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित



**प्रतिनिधी :** सोन्यासारखे दिसणारे बिस्कीट दाखवून विश्वास संपादन करत ज्येष्ठ महिलेची फसवणूक करून तिच्याकडील सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास देऊळगाव मही परिसरात घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात अज्ञात दोन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, सुमनबाई साहेबराव चेके (वय ६५, रा. सरंबा, ता. देऊळगाव राजा) या देऊळगाव मही येथे असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांच्याशी गोड बोलून संवाद सुरू केला. आरोपींनी आपल्या हातातील सोन्यासारखे चमकणारे बिस्कीट दाखवत ते खरे सोने असल्याचा आव आणून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.विश्वासात घेतल्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची पोथ (अंदाजे १६ हजार रुपये) तसेच कानातील सोन्याची फुले (अंदाजे १६ हजार रुपये) असे एकूण ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चलाखीने काढून घेतले. त्याबदल्यात फिर्यादीस बनावट सोन्यासारखे बिस्कीट देऊन दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. थोड्याच वेळात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सुमनबाई चेके यांनी तातडीने देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलीसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३(५) अंतर्गत अज्ञात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार ब्रह्मगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कलीम देशमुख करीत आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून पोलीसांनी तपासाला वेग दिला आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, कुठल्याही आमिषाला बळी न पडता सतर्क राहावे, असे आवाहन देऊळगाव राजा पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विदर्भ मुख्याध्यापक संघाची कार्यकारिणी जाहीर

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्हास ठाकरे



**कारंजा :** विदर्भ मुख्याध्यापक संघाची नवीन कार्यकारिणी एकमताने जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी समीर देवतळे तर सचिवपदी अकोल्याचे दिनेश तायडे यांची निवड करण्यात आली. कमला नेहरू महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या सभेत ही निवड करण्यात आली. विदर्भ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या नवीन कार्यकारणी मध्ये वाशिम जिल्ह्याला चार पदे मिळाली. त्यामध्ये श्री.धानोरकर आदर्श विद्यालय धानोरा येथील प्राचार्य मंगेश धानोरकर यांची कार्याध्यक्ष पदी, बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डीचे मुख्याध्यापक विजय भड यांची सहसचिव पदी, राजमाता जिजाऊ विद्यालय तामसीचे मुख्याध्यापक मिलिंद कवर यांची संघटन सचिव पदी, माधवराव पाटील विद्यालय कारलीचे प्राचार्य उपेंद्र पाटील यांची जिल्हा प्रतिनिधी पदी निवड करण्यात आली आहे. विदर्भ मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारणी मध्ये प्रथमच वाशिम जिल्ह्याला चार महत्त्वाची पदे मिळाली तसेच कार्याध्यक्ष पद सुद्धा प्राप्त झाले. त्यामुळे वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघात नवचैत्यन निर्माण झाले आहे. यापुढे मुख्याध्यापक संघटना जोमाने या जबाबदारी काम करणार असे मग नवीन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलं आहे. सर्व नवीन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन विदर्भ मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष सतीश जगताप, सचिव विलास भारसाकडे, उपाध्यक्ष मंदाताई ऊमाटे व वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे, उपाध्यक्ष बाळासाहेब गोटे, सचिव विजय शिंदे यांनी केले आहे.

## कारंजा येथे लोकमान्य व्यायाम शाळेच्या शतकमहोत्सवानिमित्त भव्य कबड्डी स्पर्धा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्हास ठाकरे




**कारंजा :** कारंजा शहराच्या क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या लोकमान्य व्यायाम शाळेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त भव्य आमंत्रित कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक २, ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी लोकमान्य व्यायाम शाळेच्या मैदानावर पार पडणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र व विदर्भातील एकूण १६ नामांकित पुरुष कबड्डी संघ सहभागी होणार असून, कबड्डीप्रेमींना उच्च दर्जाचे सामने पाहण्याची संधी मिळणार आहे. प्रेक्षकांसाठी मैदानावर गॅलरीची व्यवस्था करण्यात आली असून, सर्व सामने लोकमान्य व्यायाम शाळेच्या अधिकृत युट्युब चॅनेलवरून थेट प्रक्षेपित केले जाणार आहेत. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, २ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटक म्हणून आमदार सौ. सईताई प्रकाश डहाके (कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघ) उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून नगरपरिषद कारंजाचे मुख्याधिकारी श्री. महेशजी वाघमोडे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. किशोर बोंडे तसेच माजी नगराध्यक्ष श्री. दत्तराजजी डहाके यांची उपस्थिती लाभणार आहे. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार सौ. सईताई प्रकाश डहाके तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी कारंजा श्री. कैलासजी देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रदीपजी पाडवी व माजी नगराध्यक्ष श्री. दत्तराजजी डहाके उपस्थित राहणार आहेत. ही भव्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लोकमान्य व्यायाम शाळेचे पदाधिकारी, ज्येष्ठ सदस्य तसेच आजी-माजी खेळाडू परिश्रम घेत असून, या स्पर्धेमुळे कारंजा शहराच्या क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळणार आहे.

# भक्ती, प्रवचन आणि कीर्तनाच्या साक्षीने सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांचा २३ वा पुण्यतिथी उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी



**दे. राजा :** ह.भ.प. प.पू. सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या २३ व्या पुण्यतिथीनिमित्त एकदिवसीय पुण्यतिथी उत्सव आदर्श कॉलनी येथील संत सेनाजी महाराज सामाजिक सभागृहाच्या प्रांगणात दि. २९ डिसेंबर रोजी अत्यंत भक्तिमय, शांत व आध्यात्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा पुण्यतिथी सोहळा ह.भ.प. गुरुवर्य डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांच्या पावन आशीर्वादाने तसेच ह.भ.प. गंभीर गुरुजी यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच सभागृह परिसरात वारकरी संप्रदायाचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद आणि "नामस्मरणाचा" अखंड प्रवाह सुरू होता. कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प. संतचरणदास निकम गुरुजी यांच्या प्रभावी प्रवचनाने झाली. आपल्या प्रवचनातून त्यांनी सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या जीवनकार्याचा, त्यागाचा, समाजप्रबोधनाचा आणि भक्तीमार्गाचा सखोल ऊहापोह केला. "सद्गुरूंचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत," असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यानंतर गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांचे भावस्पर्शी काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. भक्ती, विनोद आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर संगम असलेल्या या कीर्तनाने संपूर्ण वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. या प्रसंगी उत्सव समितीच्या वतीने ह.भ.प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष माधुरी शिंपणे, नवनिर्वाचित नगरसेवक व राजेंद्र खांडेभराड यांचाही मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला.या पुण्यतिथी उत्सवात परिसरातील तसेच तालुक्यातील वारकरी, टाळकरी, भजनी मंडळे आणि असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.हा संपूर्ण पुण्यतिथी सोहळा अत्यंत नियोजनबद्ध व भक्तिभावाने पार पडण्यासाठी ह.भ.प. देविदास खरात व गुरुवर्य रामचरणदास बाबा पुण्यतिथी उत्सव समिती, आदर्श कॉलनी, देऊळगांव राजा यांनी विशेष परिश्रम घेतले.सद्गुरू वै. रामचरणदास महाराज यांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा पुण्यतिथी उत्सव देऊळगांव राजा शहरासाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरला, अशी भावना भाविकांमधून व्यक्त होत होती.

## घटना -घडामोडी

### अजित पवारांचे गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ:आंदेकरांच्या घरात दोघांना उमेदवारी, गजा मारणेच्या पत्नीलाही तिकीट

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्र कल्याणाची भाषा करणारे, त्यासाठीच काकाला सोडून भाजपसोबत गेल्याचा दावा करणारे अजित पवार यांनी पुण्यात चक्क कुख्यात गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ दिल्याचे समोर आले आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपत असताना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गजा मारणेंच्या पत्नीनंतर आता स्वतःचा नातू आयुष कोमकर याच्या हत्या प्रकरणात आणि कोट्यवधींच्या खंडणी प्रकरणात येरवडा कारागृहात असलेल्या सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांना उमेदवारी दिली आहे.

आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याच्या कुटुंबाला मिळालेल्या या राजकीय पाठबळामुळे पुण्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. बंडू आंदेकर कुटुंबाच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे या उमेदवारीबाबत अजित पवार गटाने सुरुवातीपासूनच कमालीची गुप्तता पाळली होती. अधिकृत घोषणा न करता थेट अर्ज भरण्यावर भर देण्यात आला. जेणेकरून विरोधाची धार कमी करता येईल. मात्र, आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणी आंदेकर यांच्या वकिलांनी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात धाव घेत 'एबी' फॉर्म सादर केले आणि ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. आंदेकरांच्या वतीने त्यांच्या वकिलांनीच ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. बंडू आंदेकर आणि त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांनी निवडणूक लढवण्यासाठी विशेष न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. "निवडणूक लढवणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे," असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्यांना अर्ज भरण्याची मुभा दिली. मात्र, न्यायालयाने काही कडक अटीही घातल्या आहेत. अजित पवार यांच्या पक्षाकडून आज सकाळी कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे हिला उमेदवारी देऊन चर्चेला उधाण आणले होते. आता त्यानंतर लगेचच बंडू आंदेकर कुटुंबाला उमेदवारी दिल्याने, अजित पवारांच्या 'गुन्हेगारीमुक्त पुणे' या घोषणेची खिल्ली उडवली जात आहे. ५ कोटी ४० लाखांच्या खंडणी प्रकरणात आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तींना सत्ताधारी पक्ष उमेदवारी कशी देऊ शकतो, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गुंड बंडू आंदेकर आणि गुंड गज्या मारणे या दोघांचाही गुन्हेगारीचा तगडा इतिहास आहे. या दोघांची गुन्हेगारी प्रकरणे राज्यभर गाजली आहेत. असे असताना, सत्ताधारी पक्षाने अशा प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पाठबळ दिल्याने पुण्यातील राजकीय वर्तुळात आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. आंदेकर कुटुंबाला देण्यात येणाऱ्या उमेदवारीला आयुषच्या आईने तीव्र विरोध दर्शवला आहे. "आंदेकर टोळीने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत, त्यांना उमेदवारी देऊ नका." जर त्यांना उमेदवारी दिली तर मी पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करेन, असा इशारा बंडू आंदेकर याची मुलगी आणि मृत आयुष कोमकरची आई हिने अजित पवारांना दिला होता. मात्र, या आर्त हाकेकडे दुर्लक्ष करत अजित पवारांच्या पक्षाने आंदेकर कुटुंबातील दोघींना प्रभाग क्रमांक २३ मधून निवडणुकीसाठी तिकीट दिले. दुसरीकडे, गज्या मारणेची पत्नी जयश्री मारणे यांना देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून तिकीट देण्यात आले आहे. त्या प्रभाग क्रमांक 10 मधून अधिकृत उमेदवार असतील. त्यांना पक्षाने एबी फॉर्महीदिला आहे. जयश्री मारणे यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. गजा मारणे सध्या कोथरूडमधील एका दुचाकीस्वाराला मारहाण केल्याप्रकरणी तुरुंगात बंदिस्त आहे. हा दुचाकीस्वार केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयात काम करत होता. त्याला गजा मारणे याच्या टोळीने बेदम मारहाण केली होती. त्यानंतर गजा मारणे याच्यासह त्याच्या काही सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली होती. या वादग्रस्त उमेदवारीमुळे पुण्यात निवडणुकीच्या निकालापेक्षा या उमेदवारांच्या नैतिकतेवरच जास्त चर्चा रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता पुणेकर या 'गुन्हेगारी' पार्श्वभूमीच्या उमेदवारांना कौल देतात की नाकारतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### मुंबईत ठाकरे गटाच्या इच्छुकांचा संताप:'आम्ही काय नुसते झेंडेच लावायचे का?' असा सवाल करत 'मातोश्री' बाहेर व्यक्त केला संताप

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंनी युती केली आहे. यामुळे अनेक प्रभागांतील राजकीय समीकरण बदलले आहे. ठाकरे गटातर्फे बंडखोरी टाळण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करण्यात येत आहेत. पण त्यानंतरही आज नाराज इच्छुक उमेदवारांचे जत्थेच्या जत्थे आज मातोश्रीवर येऊन आदळत असल्याचे चित्र होते. यापैकी अनेकांनी यावेळी पक्षावर रोष व्यक्त करत आम्ही काय नुसते झेंडेच लावायचे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने प्रभाग क्रमांक 202 मधून मुंबईच्या माजी महापौर श्रद्धा जाधव यांना उमेदवारी दिली आहे. श्रद्धा जाधव यांनी आपला मुलगा पवन जाधव याला उमेदवारी देण्याचा आग्रह धरला. त्यासाठी त्यांनी सोमवारी मातोश्रीत ठाण मांडले. पण उद्धव ठाकरे यांनी पवनच्या जागी श्रद्धा जाधव यांना उमेदवारी देऊ केली. पण आता श्रद्धा जाधव यांना उमेदवारी मिळाल्यामुळे त्यांच्या भागातील शिवसैनिक प्रचंड संतापल्याचे चित्र आहे. या प्रकरणी एक शाखाप्रमुख आपला रोष व्यक्त करताना म्हणाला, मी सामान्य शिवसैनिक आहे. मागील 36 वर्षांपासून पक्षाचे काम करतो. पण आम्ही फक्त झेंडे लावण्याचेच काम करायचे का? श्रद्धा जाधव शाखेच्या विद्युत बीलही भरत नाहीत. मेन्टेन्सही देत नाहीत. शाखेत पाऊल टाकत नाहीत. त्यांनी अक्षरशः शाखा विकून खाल्ली. सगळे निगेटिव्ह रिपोर्ट दिले. त्यानंतरही त्यांना उमेदवारी देण्यात आली. स्वतःला तिकीट, नवऱ्याला तिकीट, मुलाला तिकीट, सासऱ्याला तिकीट, मग आम्ही जायचे कुठे? याच वॉर्डातील अन्य एका महिला शिवसैनिकानेही यावेळी आपला रोष व्यक्त केला. त्या म्हणाल्या, या बाईला 7 वेळा उमेदवारी दिली गेली. आम्ही कट्टर शिवसैनिक आहोत. आमचे आयुष्य शिवसेनेसाठी गेले. आम्ही शिवेसनेसाठी डोकी फोडतो. आमचा जीव जाळतो. पण आमच्यासोबत गद्दारी झाली. आमचा शाखाप्रमुख इतके दिवस काम करतो, पण उद्धव ठाकरे नेहमी श्रद्धा जाधव यांचेच ऐकतात. मग आम्ही आहोत तरी कोण तुमच्या नजरेत? आम्ही कुणीच नाही का? आम्ही पाय जाळतो तेव्हा शिवसेनेचा उमेदवार जिंकून येतो. हे उद्धव ठाकरे साहेबांना कळत नाही का? तुमच्यासाठी श्रद्धा जाधव मोठ्या आहेत, मग आम्ही चिंधी आहोत का? यावेळी अन्य एका महिला शिवसैनिक म्हणाले, 2017 च्या निवडणुकीत श्रद्धा जाधव निवडून आल्या. त्यावेळी महिलांना साड्या वाटल्या. पण त्याचे 3 लाख रुपये अजून त्यांनी दिले नाही. दागिने गहाण ठेवून मी त्या साड्या विकत घेतल्या होत्या.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पालकांचा आक्रोश; फुले नगरपरिषद शाळेसाठी तातडीच्या सुविधांची ठाम मागणी

## "सुरक्षा भिंत, सीसीटीव्ही, चौकीदार नसताना स्थलांतर नको!, पालकांचा मुख्याधिकाऱ्यांना थेट इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित



**दे.राजा :** क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले नगरपरिषद शाळा, देऊळगाव राजा येथील नवीन इमारतीत विद्यार्थ्यांचे स्थलांतर करण्यापूर्वी आवश्यक सुरक्षात्मक व मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, या ठाम मागणीसाठी पालकांनी एकत्र येत दि. 26 डिसेंबर 2025 रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद देऊळगाव राजा यांना सविस्तर निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको, अशी स्पष्ट भूमिका पालकांनी मांडली आहे. यापूर्वी दि. 25 डिसेंबर 2025 रोजी शाळेची पालकसभा पार पडली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सखोल चर्चा करण्यात आली. उत्कृष्ट अध्यापन कार्याबद्दल शिक्षकवृंदांचे पालकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यानंतर सर्व पालकांनी नवीन शाळा इमारतीची पाहणी केली. इमारतीचे बांधकाम दर्जेदार असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले; मात्र सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक बाबी अपूर्ण असल्याचे सर्वानुमते निदर्शनास आले. सुरक्षा धोक्यात; पालकांची तीव्र चिंता नवीन इमारतीला अद्याप सुरक्षा भिंत नसल्यामुळे मोकाट कुत्रे व जनावरे शाळा परिसरात फिरताना दिसत आहेत. लहान मुलांच्या जीवितास धोका संभवतो, हे नाकारता येत नसल्याचे पालकांनी स्पष्ट केले. त्यामुळे सुरक्षा भिंत पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांचे स्थलांतर करू नये, अशी ठाम मागणी करण्यात आली. पालकांच्या प्रमुख मागण्या (तातडीने पूर्ण करण्याची मागणी): नवीन शाळा इमारतीस त्वरित सुरक्षा भिंत बांधण्यात यावी विद्यार्थ्यांच्या व इमारतीच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक/चौकीदार नेमण्यात यावा सर्व वर्गखोल्या व शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत शाळेलगत असलेल्या धोकादायक पडीत वस्तू त्वरित हटवून सुरक्षित मैदान उपलब्ध करून द्यावे विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी नवीन पाण्याची टाकी व आरओ/ ॲक्वा फिल्टर बसविण्यात यावा विद्यार्थी संख्येनुसार अतिरिक्त वर्गखोल्या व सभागृह उभारण्यात यावे शाळेसाठी पेवर ब्लॉक, सांस्कृतिक मंच (डोम) उपलब्ध करून द्यावा शाळा डिजिटल करण्यासाठी आवश्यक साहित्य व क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे

प्रशासनाकडे सहानुभूतीपूर्वक निर्णयाची अपेक्षा वरील सर्व मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक व तातडीने विचार करून अंमलबजावणी करावी, जेणेकरून पालक विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत निश्चिंत राहतील, अशी भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी, बुलढाणा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा तसेच मुख्याध्यापक, क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले नगरपरिषद शाळा, देऊळगाव राजा यांना माहितीसाठी सादर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षा हीच प्राथमिकता — आता प्रशासन काय निर्णय घेते, याकडे पालकांसह संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.



चिखली येथील प्रभाग क्रमांक 12 मधील मुस्लिम कब्रस्तानातील विविध विकास कामांना गती देऊन राहिलेले तात्काळ कामे पूर्ण करण्याबाबत नगरपालिका प्रशासन यांना जागा करण्यासाठी मोहम्मद सोहील मोहम्मद आसीफ , श्रीकांत राऊत ,प्रशांत भटकर, अप्पू खान ,मोहम्मद सादिक, मिलिंद हिवाळे ,असलम शेख, शेख तौसीफ ,मनोज मस्के,शेख अफजल ,अली खान,मोहम्मद वसीम,मलिक शेख,जीवन सोनवणे इत्यादी नागरिक निवेदन देताना उपस्थित होते. (फोटो -जाकीर खान चिखली)

### आमदार सई डहाके यांच्या प्रयत्नांना यश, दादगाव ते पिंपळगाव रस्त्याला अखेर शासनाची मंजुरी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्हास ठाकरे



**कारंजा :** कारंजा–मानोरा विधानसभा मतदारसंघातील दादगाव ते पिंपळगाव या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर शासनाची मंजुरी मिळाली असून त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आमदार सई प्रकाश डहाके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागला आहे.कारंजा सोहळ वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्यामुळे स्थानिक नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात नव्हे तर बाराही महिने रस्त्याची दुरवस्था होत असल्याने शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच रुग्णवाहिकांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते. या समस्येच्या निराकरणासाठी आमदार सई प्रकाश डहाके यांनी नागपूर येथे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. तसेच राज्याचे मंत्री ना. गणेशजी नाईक यांची भेट घेऊन रस्त्याच्या मंजुरीसाठी ठोस भूमिका मांडली. वन विभाग व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याने अखेर या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. या रस्त्याच्या कामामुळे दादगाव, पिंपळगाव व परिसरातील नागरिकांचा प्रवास सुकर होणार असून शेतीमाल वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच व्यापार-विकासाला चालना मिळणार आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निर्णयाबद्दल परिसरातील नागरिकांनी आमदार सई प्रकाश डहाके यांचे आभार मानले असून जनहिताच्या प्रश्नांसाठी केलेला पाठपुरावा यशस्वी झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जवळपास मागील १५ वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल पिंपळगाव येथील ग्रामवासीयांनी आमदार सई प्रकाश डहाके यांचे जाहिर आभार मानले.

➲ ANCHOR "सुरक्षा भिंत, सीसीटीव्ही, चौकीदार नसताना स्थलांतर नको!"

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पालकांचा आक्रोश; फुले नगरपरिषद शाळेसाठी तातडीच्या सुविधांची ठाम मागणी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित



**दे.राजा :** क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले नगरपरिषद शाळा, देऊळगाव राजा येथील नवीन इमारतीत विद्यार्थ्यांचे स्थलांतर करण्यापूर्वी आवश्यक सुरक्षात्मक व मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, या ठाम मागणीसाठी पालकांनी एकत्र येत दि. 26 डिसेंबर 2025 रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद देऊळगाव राजा यांना सविस्तर निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको, अशी स्पष्ट भूमिका पालकांनी मांडली आहे. यापूर्वी दि. 25 डिसेंबर 2025 रोजी शाळेची पालकसभा पार पडली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सखोल चर्चा करण्यात आली. उत्कृष्ट अध्यापन कार्याबद्दल शिक्षकवृंदांचे पालकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यानंतर सर्व पालकांनी नवीन शाळा इमारतीची पाहणी केली. इमारतीचे बांधकाम दर्जेदार असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले; मात्र सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक बाबी अपूर्ण असल्याचे सर्वानुमते निदर्शनास आले. सुरक्षा धोक्यात; पालकांची तीव्र चिंता नवीन इमारतीला अद्याप सुरक्षा भिंत नसल्यामुळे मोकाट कुत्रे व जनावरे शाळा परिसरात फिरताना दिसत आहेत. लहान मुलांच्या जीवितास धोका संभवतो, हे नाकारता येत नसल्याचे पालकांनी स्पष्ट केले. त्यामुळे सुरक्षा भिंत पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांचे स्थलांतर करू नये, अशी ठाम मागणी करण्यात आली. पालकांच्या प्रमुख मागण्या (तातडीने पूर्ण करण्याची मागणी): नवीन शाळा इमारतीस त्वरित सुरक्षा भिंत बांधण्यात यावी विद्यार्थ्यांच्या व इमारतीच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक/चौकीदार नेमण्यात यावा सर्व वर्गखोल्या व शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत शाळेलगत असलेल्या धोकादायक पडीत वस्तू त्वरित हटवून सुरक्षित मैदान उपलब्ध करून द्यावे विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी नवीन पाण्याची टाकी व आरओ/ ॲक्वा फिल्टर बसविण्यात यावा विद्यार्थी संख्येनुसार अतिरिक्त वर्गखोल्या व सभागृह उभारण्यात यावे शाळेसाठी पेवर ब्लॉक, सांस्कृतिक मंच (डोम) उपलब्ध करून द्यावा शाळा डिजिटल करण्यासाठी आवश्यक साहित्य व क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे

प्रशासनाकडे सहानुभूतीपूर्वक निर्णयाची अपेक्षा वरील सर्व मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक व तातडीने विचार करून अंमलबजावणी करावी, जेणेकरून पालक विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत निश्चिंत राहतील, अशी भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी, बुलढाणा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा तसेच मुख्याध्यापक, क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले नगरपरिषद शाळा, देऊळगाव राजा यांना माहितीसाठी सादर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षा हीच प्राथमिकता — आता प्रशासन काय निर्णय घेते, याकडे पालकांसह संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

धन्वंतरी हॉस्पिटल
अंबड चौफुली, गायत्री लॉन जवळ, सोरटी नगर, जालना. Mob.: 9421644919 / 7620649157
उपचारापूर्वी उपचारानंतर
मुळव्याध, भगंदर, फिशर
संडासाच्या जागी आग होणे, ठणक लागणे
रक्त पडणे, केसतोड होणे, पू रक्त येणे इ.त्रास
उपचार
* इंजेक्शन थेरपी * क्षारसुत्र थेरपी * ऑपरेशन * दररोज मलमपट्टीची गरज नाही * एकदा ऑपरेशन करा मुळव्याध पासून मुक्ती अनुभवा
डॉ. योगेशसिंह कच्छवाह (राजपुत) M.D. Ayu. डॉ. नयना यो. कच्छवाह (राजपुत) B.A.M.S.
आयुर्वेदीक पंचकर्म उपचार
* सांधेवात * कंबर दुखी * आम्लपित्त * त्वचारोग * ॲलर्जी, दमा * मानदुखी * मणक्यातील गॅप
* मानसिक विकार * वजन वाढवणे * स्त्रियांचे आजार * मुतखडा * जुनाट सर्दी * दारू सोडवणे
* संपूर्ण पंचकर्म इ. सर्व रोग